मिरा भाईंदर महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग

// गोषवारा //

दि. 03/04/2023

प्रकरण क्र.४४ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणे कामाचे अवलोकन करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणेकामी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेऊन मनपाच्या नोटीस बोर्डवर जाहीर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याकरिता पात्र असलेले दरपत्रकधारक मे. यमुना इंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने दरपत्रकातील दरास मा.आयुक्त सो. दि.05/04/2023 रोजी मान्यता दिलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणेकामी अंदाजित रु. 50,000/- च्या मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. तरी रु. 50,000/- पर्यंत येणा-या खर्चास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेस विनंती आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (मध्यवर्ती भांडार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मध्यवर्ती भांडार विभाग

प्रशासकीय ठराव दि.03/04/2023

प्रकरण क्र. ४४ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणे कामाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. ४४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणे कामाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या 1 (अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी / अस्थायी अधिकारी / कर्मचा-यांकरिता ओळखपत्र छपाई करणे" याकामी दरपत्रकधारक मे. यमुना इंटरप्रायजेस यांच्यामार्फत छपाई करणेकामी रु. 50,000/- च्या मर्यादेत खर्चास मान्यता देत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

(गोषवारा)

दि. 02/05/2023

विषय :- ४५ महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता नेमण्यात आलेल्या सल्लागारास मुदतवाढ देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचा-यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार नेमणेबाबात दि.04/01/2022 रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निविदेनुसार मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना 01 वर्षाकरीता दि.24/02/2022 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांच्या दराला 01 वर्षाकरीता होणाऱ्या खर्चाबाबतच्या प्रतीवृत्तास मा.स्थायी समिती सभा दि.14/03/2022, ठराव क्र.143 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरची मुदत दि.23/02/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26 ऑगस्ट, 2022 अन्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

मे.वेदांत इंटरप्राईजेस या सल्लागाराचे मासिक मानधन रु.54,000/- असुन वार्षिक खर्च रु.6,48,000/- (अक्षरी रु. सहा लाख अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षाअंतर्गत तरतुदीतून करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 73 अन्वये महागनरपालिकेच्या वतीने संविधा करुन देण्याचा अधिकार मा.आयुक्ता महोदय यांचेकडे रु.25 लाखपर्यंत निहित आहे.

सबब महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार यांची दि.23/02/2023 रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने 01 दिवसाचा दि.24/02/2023 रोजी तांत्रिक खंड देऊन तसेच दि.25/02/2023 व दि.26/02/2023 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.27/02/2023 ते दि.26/02/2024 पर्यंत 01 वर्षाकरीता मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना मुदतवाढ कार्यादेश देणेस तसेच वार्षिक रु.6,48,000/- (अक्षरी रु. सहा लाख अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतक्या खर्चाचे प्रतीवृत्ताबाबतच्या गोषवाऱ्यास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय सभा दि. 03/05/2023

विषय :- ४५ महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता नेमण्यात आलेल्या सल्लागारास मुदतवाढ देणेबाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचा-यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार नेमणेबाबात दि.04/01/2022 रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निविदेनुसार मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना 01 वर्षाकरीता दि.24/02/2022 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांच्या दराला 01 वर्षाकरीता होणाऱ्या खर्चाबाबतच्या प्रतीवृत्तास मा.स्थायी समिती सभा दि.14/03/2022, ठराव क्र.143 अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरची मुदत दि.23/02/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्रमांक :-एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26 ऑगस्ट, 2022 अन्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

मे.वेदांत इंटरप्राईजेस या सल्लागाराचे मासिक मानधन रु.54,000/- असुन वार्षिक खर्च रु.6,48,000/- (अक्षरी रु. सहा लाख अडेचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षाअंतर्गत तरतुदीतून करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 73 अन्वये महागनरपालिकेच्या वतीने संविधा करुन देण्याचा अधिकार मा.आयुक्ता महोदय यांचेकडे रु.25 लाखपर्यंत निहित आहे.

सबब महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता सल्लागार यांची दि.23/02/2023 रोजी मुदत संपुष्टात येत असल्याने 01 दिवसाचा दि.24/02/2023 रोजी तांत्रिक खंड देऊन तसेच दि.25/02/2023 व दि.26/02/2023 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.27/02/2023 ते दि.26/02/2024 पर्यंत 01 वर्षाकरीता मे.वेदांत इंटरप्राईजेस (श्री.अनंत चौधरी) यांना मुदतवाढ कार्यादेश देणेस तसेच वार्षिक रु.6,48,000/- (अक्षरी रु. सहा लाख अडेचाळीस हजार मात्र) इतक्या खर्चाचे प्रतिवृत्तास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र. ४५ दिनांक 03/05/2023

महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता नेमण्यात आलेल्या सल्लागारास मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा 1952 मधील व संलग्न कायदयामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरीता नेमण्यात आलेल्या सल्लागारास मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करीता सादर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

मा. प्रशासकीय सभा दि. 03/ 05 /2023

// गोषवारा //

प्रकरण क्रं. ४६ :- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्स संचलन व देखभालीकरीता प्राप्त निविदेबाबत.

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्स् संचलन व देखभालीकरीता बीड काऊंट पेजवरुन Malchand Dindayal Salts PVT.LTD, R. S. Construction, Mira Construction, Harshil Enterprises राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभालीकरीता 04 निविदाधारकांनी आवश्यक् कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. परंतु MALCHAND DINDAYAL SALTS PVT. LTD यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभालीकरीता सादर केलेली निविदा काही कारणास्तव् मागे घेत असुन सदर संस्थेचे फायनान्शीयल बीड उघडण्यात येऊ नये याबाबत लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे. त्यानुसार त्यांची EMD मनपा मध्ये जमा करण्यात आलेली आहे.

तरी सदर MALCHAND DINDAYAL SALTS PVT. LTD अनामत रक्कम जप्त करुन प्राप्त 04 निविदाधारकांपैकी **Malchand Dindayal Salts PVT.LTD या निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड न उघडता** उर्वरीत R. S. Construction, Mira Construction, Harshil Enterprises या 03 निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड उघडणेबाबत मा. निविदा निवड समितीच्या मंजुरीअन्वये फायनान्शीयल बीड उघडले असता पात्र निविदाधारकांनी राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स इमारत संचलन व देखभाल करणेकरीता ROYALTY चे खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	तपशिल	R. S. Construction	Mira Construction	Harshil Enterprises
1	राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी	**2100000/-**	2075000/-	2025000/-

	स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभाल करणेबाबत			

वरील तुलनात्मक् तक्ता पाहता R.S. Construction यांनी सादर केलेली ROYALTY इतर दोन निविदाधारकांनी सादर केलेल्या ROYALTY पेक्षा जास्त आहे.

सदर ROYALTY च्या रक्कमेस मा. निविदा निवड समितीने दि. /04/2023 रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी सदर **R. S. Construction** यांनी सादर केलेले ROYALTY चे दर मंजुर करुन सदर संस्थेस राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभाल करणेकरीता कार्यादेश देण्याकरीता प्रशासकीय ठराव करणेस शिफारस आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (क्रीडा विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा पत्र - 28/9/2023 दुपारी 4:30
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ. क्र. २९ वर्ष 2023/24
28/9/2023
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता.जि.ठाणे

क्रीडा विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.03/05/2023

प्रकरण क्रं.४६ :- राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्स संचलन व देखभालीकरीता प्राप्त निविदेबाबत.

प्रशासकीय ठराव क्रं.४६ दिनांक : 03/05/2023

राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले मिनी स्पोर्टस कॉम्पलेक्स् संचलन व देखभालीकरीता बीड काऊंट पेजवरुन Malchand Dindayal Salts PVT.LTD, R. S. Construction, Mira Construction, Harshil Enterprises राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभालीकरीता 04 निविदाधारकांनी आवश्यक् कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. परंतु MALCHAND DINDAYAL SALTS PVT. LTD यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभालीकरीता सादर केलेली निविदा काही कारणास्तव् मागे घेत असुन सदर संस्थेचे फायनान्शीयल बीड उघडण्यात येऊ नये याबाबत लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे. त्यानुसार त्यांची EMD मनपा मध्ये जमा करण्यात आलेली आहे.

तरी सदर MALCHAND DINDAYAL SALTS PVT. LTD अनामत रक्कम जप्त करुन प्राप्त 04 निविदाधारकांपैकी **Malchand Dindayal Salts PVT.LTD या निविदाधारकाचे फायनान्शीयल बीड न उघडता** उर्वरीत R. S. Construction, Mira Construction, Harshil Enterprises या 03 निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड उघडणेबाबत मा. निविदा निवड समितीच्या मंजुरीअन्वये फायनान्शीयल बीड उघडले असता पात्र निविदाधारकांनी राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स इमारत संचलन व देखभाल करणेकरीता ROYALTY चे खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

अ.क्र.	तपशिल	R. S. Construction	Mira Construction	Harshil Enterprises
1	राष्ट्रीय महामार्ग क्रं.08	**2100000/-**	2075000/-	2025000/-

	लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभाल करणेबाबत			

वरील तुलनात्मक् तक्ता पाहता R. S. Construction यांनी सादर केलेली ROYALTY इतर दोन निविदाधारकांनी सादर केलेल्या ROYALTY पेक्षा जास्त् आहे.

सदर ROYALTY च्या रक्कमेस मा. निविदा निवड समितीने दि. /04/2023 रोजी मंजुरी दिलेली आहे. तरी सदर **R. S. Construction** यांनी सादर केलेले ROYALTY चे दर मंजुर करुन सदर संस्थेस राष्ट्रीय महामार्ग क्रं.08 लगत लोढा ॲमिनीटी स्पेस मध्ये बांधलेले स्पोर्टस कॉम्पलेक्स् इमारत संचलन व देखभाल करणेकरीता कार्यादेश देण्याकरीता प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार क्रीडा विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// विद्युत विभाग //

// ठराव //

दि. 03/05/2023

प्रकरण क्रमांक (४७) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल बसविणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव करण्यात आले आहेत. सदर स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम मे. अदानी इलेक्ट्रीसिटी लि. यांच्या मार्फत करण्यात येत असून त्यांना All in hire या योजनेनूसार व बृहन्मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानूसार वेळोवेळी वीज बील व देखभाल दुरूस्तीचे देयके तसेच वाढीव दरानूसार देयके अदा करण्यात येत असतात.

अ.क्र.	स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे ठिकाण	मंजूर पोल संख्या
1.	उत्तन पातानबंदर मार्ग भाईंदर (प)	10
2.	उत्तन सी फुड सोसायटी मार्ग भाईंदर (प)	10
3.	भाईंदर (प) राई गाव श्री समर्थ कृपा हॉल रस्ता	10
4.	पेणकरपाडा दर्वेश तारासिंग कंपाऊड येथे स्ट्रीट लाईट पोल बसविणे.	13
5.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट लाईट	25
6.	भाईंदर (प) अमृतवाणी व डी-मार्ट रोड	63
7.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट पोल एल.ई.डी मध्ये रुपांतरीत करणे.	25
8.	1) मिरारोड (पू) 15 नंबर बस स्टॉप एस.टी.पी प्लान्ट जवळ 2) गोडदेव गाव अंतर्गत विविध ठिकाणी 3) इंद्रलोक राधा कृष्णा मंदिर जवळ	11
9.	मिरारोड (पू) शांती गार्डन येथील डी.पी.रोड	04
10.	मिरारोड (पू) घोडबंदर संगनाई देवी मंदिर वेस्टर्न हायवे सर्विस रोड	05
11.	भाईंदर (प) 1) व्यंकटेश पार्क विनायक नगर राई कोठार गल्ली	06
12.	भाईंदर (पू) इंद्रलोक फेस-3	09
13.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	05
14.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	03
15.	मिरारोड (पू) लवलेश एनक्लेव	09
16.	भाईंदर (प) सि.फुड उत्तन	06
17.	विनायक नगर भाईंदर (प)	05
18.	कलासिल्क डी.पी रोड	30
19.	मांडवीपाडा सेंट झेविअर्स स्कुल	06
20.	क्वीन्स पार्क रोड दिपक हॉस्पीटल च्या मागे	03
21.	मिरागाव मिरारोड (पू)	12
22.	माशाचा पाडा जरीमरी तलाव ते आनंद दिघे चौक पर्यंत	27
23.	गोदावरी इस्टेट भाईंदर (प) स्टेशन रोड आणि गीता नगर	02
24.	साईबाबा नगर मिरारोड (पू)	14

25.	संघवी नगर मिरारोड (पू)	03
26.	जॉगर्स पार्क, मिरारोड (पू)	06

वरील प्रस्तावांना All in hire scheme नूसार मागणी प्रमाणे मान्यता देणेस तसेच वेळोवेळी वीज वापराचे व देखभाल दुरूस्तीचे देयक अदा करण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
प्र. शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-3//2023-24/DK/MG-1

गोषवारा प्राप्त दि. 29/8/2023 वेळ 12:00 वा.
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ. क्र. 80 वर्ष 2023/24
29/8/2023
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 03/05/2023 रोजी सकाळी 11.30 वाजता.

विषय क्र. (४७) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल बसविणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट बसविणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव करण्यात आले आहेत. सदर स्ट्रीट लाईट बसविण्याचे काम मे. अदानी इलेक्ट्रीसिटी लि. यांच्या मार्फत करण्यात येत असून त्यांना All in hire या योजनेनूसार व बृहन्मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानूसार वेळोवेळी वीज बील व देखभाल दुरूस्तीचे देयके तसेच वाढीव दरानूसार देयके अदा करण्यात येत असतात.

अ.क्र.	स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे ठिकाण	मंजूर पोल संख्या
1.	उत्तन पातानबंदर मार्ग भाईंदर (प)	10
2.	उत्तन सी फुड सोसायटी मार्ग भाईंदर (प)	10
3.	भाईंदर (प) राई गाव श्री समर्थ कृपा हॉल रस्ता	10
4.	पेणकरपाडा दर्वेश तारासिंग कंपाऊड येथे स्ट्रीट लाईट पोल बसविणे.	13
5.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट लाईट	25
6.	भाईंदर (प) अमृतवाणी व डी-मार्ट रोड	63
7.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट पोल एल.ई.डी मध्ये रुपांतरीत करणे.	25
8.	1) मिरारोड (पू) 15 नंबर बस स्टॉप एस.टी.पी प्लान्ट जवळ 2) गोडदेव गाव अंतर्गत विविध ठिकाणी 3) इंद्रलोक राधा कृष्णा मंदिर जवळ	11
9.	मिरारोड (पू) शांती गार्डन येथील डी.पी.रोड	04
10.	मिरारोड (पू) घोडबंदर संगनाई देवी मंदिर वेस्टर्न हायवे सर्विस रोड	05
11.	भाईंदर (प) 1) व्यंकटेश पार्क विनायक नगर राई कोठार गल्ली	06
12.	भाईंदर (पू) इंद्रलोक फेस-3	09
13.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	05
14.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	03
15.	मिरारोड (पू) लवलेश एनक्लेव	09
16.	भाईंदर (प) सि.फुड उत्तन	06
17.	विनायक नगर भाईंदर (प)	05
18.	कलासिल्क डी.पी रोड	30
19.	मांडवीपाडा सेंट झेविअर्स स्कुल	06
20.	क्वीन्स पार्क रोड दिपक हॉस्पीटल च्या मागे	03
21.	मिरागाव मिरारोड (पू)	12

22.	माशाचा पाडा जरीमरी तलाव ते आनंद दिघे चौक पर्यंत	27
23.	गोदावरी इस्टेट भाईंदर (प) स्टेशन रोड आणि गीता नगर	02
24.	साईबाबा नगर मिरारोड (पू)	14
25.	संघवी नगर मिरारोड (पू)	03
26.	जॉगर्स पार्क, मिरारोड (पू)	06

वरील प्रस्तावांना All in hire scheme नूसार मागणी प्रमाणे मान्यता देणेस तसेच वेळोवेळी वीज वापराचे व देखभाल दुरूस्तीचे देयक अदा करण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ५७ दिनांक 03 / 04 /2023

नामकरण प्रस्तावास मान्यता देणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार खालील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्यावर स्ट्रीट लाईट पोल बसविणे प्रस्तावास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देत आहे.

अ.क्र.	स्ट्रीट लाईट पोल लावण्याचे ठिकाण	मंजूर पोल संख्या
1.	उत्तन पातानबंदर मार्ग भाईंदर (प)	10
2.	उत्तन सी फुड सोसायटी मार्ग भाईंदर (प)	10
3.	भाईंदर (प) राई गाव श्री समर्थ कृपा हॉल रस्ता	10
4.	पेणकरपाडा दर्वेश तारासिंग कंपाऊड येथे स्ट्रीट लाईट पोल बसविणे.	13
5.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट लाईट	25
6.	भाईंदर (प) अमृतवाणी व डी-मार्ट रोड	63
7.	मिरारोड (पू) पुनम गार्डन ते गंगा सदन पर्यंत स्ट्रीट पोल एल.ई.डी मध्ये रुपांतरीत करणे.	25
8.	4) मिरारोड (पू) 15 नंबर बस स्टॉप एस.टी.पी प्लान्ट जवळ 5) गोडदेव गाव अंतर्गत विविध ठिकाणी 6) इंद्रलोक राधा कृष्णा मंदिर जवळ	11
9.	मिरारोड (पू) शांती गार्डन येथील डी.पी.रोड	04
10.	मिरारोड (पू) घोडबंदर संगनाई देवी मंदिर वेस्टर्न हायवे सर्विस रोड	05
11.	भाईंदर (प) 1) व्यंकटेश पार्क विनायक नगर राई कोठार गल्ली	06
12.	भाईंदर (पू) इंद्रलोक फेस-3	09
13.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	05
14.	भाईंदर (प) राधास्वामी सत्संग रोड नाझरेथ आगर	03
15.	मिरारोड (पू) लवलेश एनक्लेव	09
16.	भाईंदर (प) सि.फुड उत्तन	06

17.	विनायक नगर भाईंदर (प)	05
18.	कलासिल्क डी.पी रोड	30
19.	मांडवीपाडा सेंट झेविअर्स स्कुल	06
20.	क्वीन्स पार्क रोड दिपक हॉस्पीटल च्या मागे	03
21.	मिरागाव मिरारोड (पू)	12
22.	माशाचा पाडा जरीमरी तलाव ते आनंद दिघे चौक पर्यंत	27
23.	गोदावरी इस्टेट भाईंदर (प) स्टेशन रोड आणि गीता नगर	02
24.	साईबाबा नगर मिरारोड (पू)	14
25.	संघवी नगर मिरारोड (पू)	03
26.	जॉगर्स पार्क, मिरारोड (पू)	06

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवलकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

मिरा-भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

// गोषवारा // दि. 03/05/2023

प्रकरण क्रमांक (४८) :- मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रकीया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता College Of Engineering Pune यांची नेमणुक करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील जमा असलेल्या जुन्या कचऱ्यावर (Legacy Waste) Bio-Mining पध्दतीने प्रकीया करणेकामी मे. ई.बी. एन्वायरो बायोटेक प्रा. लि. यांना जा.क्र.मनपा/घप्रवि/कार्या/०८/२०२२-२३ दि.२२/०२/२०२३ अन्वये कार्यादेश कार्यादेश देण्यात आला आहे. संबधित कंत्राटदाराकडून बायोमायनिंग च्या कामास सुरूवात केल्यानंतर सदर कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे करिता मा. आयुक्त सो. यांनी दि.२०/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.०२ अन्वये मे. IIT मुंबई यांना त्रयस्थ परिक्षण करणे कामी फी अदा करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिली होती. सदर कामी मे. IIT मुंबई यांनी त्रयस्थ परिक्षण करणेकामी होणाऱ्या खर्चाच्या १% + १८% GST मधील ५०% अग्रीम रक्कम अदा करणेस मागणी केलेली होती.

परंतु संदर्भ क्र.०४ अन्वये मा. उप-आयुक्त (घप्रवि) यांनी दि.२४/०३/२०२३ रोजी COEP पुणे यांना त्रयस्थ परिक्षण करणे कामी लागणारी फी कळविणे बाबत पत्रानुसार कळविणेस मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने M/S. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी लागणाऱ्या शुल्काबाबत संदर्भिय पत्र क्र.०५ अन्वये कळविण्यात आले.

सदर पत्राच्या अनुषंगाने दि.०३/०४/२०२३ रोजी College Of Engineering Pune यांनी त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमायनिंग कामाच्या एकूण खर्चाच्या ०.६०% रक्कम + १८%GST आकारण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

मे. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग करण्याकामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व याकामी येणारा खर्च बायोमायनिंग करणे या कामी येणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०.६०% रक्कम + १८%GST अदा करावी लागणार आहे सदर कामी होणारा खर्च सन २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या "बायोमायनिंग करणे" या लेखाशीर्षागातून करण्यात येणार आहे.

तरी मे. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग करणे या कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमानिंग करणे या कामाच्या होणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०.६०% रक्कम + १८%GST करण्यास मान्यता मिळण्यास व सदर कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (घप्रवि)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

प्रशासकिय ठराव दिनांक 03 / 05 /२०२३ रोजी स. ११.३० **वाजता**

विषय क्रमांक - (४८) <u>मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज</u>

मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रकीया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता College Of Engineering Pune यांची नेमणुक करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन येथील जमा असलेल्या जुन्या कचऱ्यावर (Legacy Waste) Bio-Mining पध्दतीने प्रकीया करणेकामी मे. ई.बी. एन्वायरो बायोटेक प्रा. लि. यांना जा.क्र.मनपा/घप्रवि/कार्या/०८/२०२२-२३ दि.२२/०२/२०२३ अन्वये कार्यादेश कार्यादेश देण्यात आला आहे. संबधित कंत्राटदाराकडून बायोमायनिंग च्या कामास सुरूवात केल्यानंतर सदर कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे करिता मा. आयुक्त सो. यांनी दि.२०/०१/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.०२ अन्वये मे. IIT मुंबई यांना त्रयस्थ परिक्षण करणे कामी फी अदा करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिली होती. सदर कामी मे. IIT मुंबई यांनी त्रयस्थ परिक्षण करणेकामी होणाऱ्या खर्चाच्या १% + १८% GST मधील ५०% अग्रीम रक्कम अदा करणेस मागणी केलेली होती.

परंतु संदर्भ क्र.०४ अन्वये मा. उप-आयुक्त (घप्रवि) यांनी दि.२४/०३/२०२३ रोजी COEP पुणे यांना त्रयस्थ परिक्षण करणे कामी लागणारी फी कळविणे बाबत पत्रानुसार कळविणेस मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने M/S. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी लागणाऱ्या शुल्काबाबत संदर्भिय पत्र क्र.०५ अन्वये कळविण्यात आले.

सदर पत्राच्या अनुषंगाने दि.०३/०४/२०२३ रोजी College Of Engineering Pune यांनी त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमायनिंग कामाच्या एकूण खर्चाच्या ०.६०% रक्कम + १८%GST आकारण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

मे. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग करण्याकामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व याकामी येणारा खर्च बायोमायनिंग करणे या कामी येणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०.६०% रक्कम + १८%GST अदा करावी लागणार आहे सदर कामी होणारा खर्च सन २०२३-२४ आर्थिक वर्षाच्या "बायोमायनिंग करणे" या लेखाशीर्षागातून करण्यात येणार आहे.

तरी मे. College Of Engineering Pune यांना बायोमायनिंग करणे या कामाचे त्रयस्थ परिक्षण करणे कामी नेमणूक करणे व त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमानिंग करणे या कामाच्या होणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०.६०% रक्कम + १८%GST अदा करण्यास मान्यता मिळण्यास व सदर कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

<u>प्रशासकीय ठराव क्र.</u> ४८ **<u>दिनांक</u>** 03/05/2023

मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रक्रिया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता मे. College Of Engineering Pune यांची नेमणुक करणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका उत्तन येथील जुन्या असलेल्या कचऱ्यावर (Legacy Waste) प्रक्रिया करणे कामाचे त्रयस्थ परिक्षण (Third party Audit) करणे करिता मे. College Of Engineering Pune यांची नेमणुक करणे व त्रयस्थ परिक्षण करणे या कामी अदा करावयाची फी ही बायोमायनिंग करणे या कामाच्या होणाऱ्या खर्चाच्या रकमेच्या ०.६०% रक्कम + १८%GST अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

मिरा भाईंदर महानगरपालिका

(गोषवारा)

दि. 03/04/2023

४९

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागातील विविध प्रकारच्या विम्याकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून निविदा स्विकृती करण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळया मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टेंडर व विविध फायर फायटींग वाहनाचा विमा व वाहन विभागामार्फत चालविणाऱ्या सर्व वाहनांचा दरपत्रकाद्वारे जाहिर सूचना करण्याकरीता दि.17/03/2023 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपरोक्त विभागाकरीता विविध प्रकारच्या विम्यासाठी विमा सल्लागार/दलाल यांचेकडून 01 वर्षाकरीता दि.21/03/2023 रोजी दरपत्रकाव्दारे जाहिर निविदा सूचना प्रसिध्द केलेली आहे.

सदर जाहिर निविदा सूचनेमध्ये सिलबंद लिफाफ्यातील दरपत्रक दि.31/03/2023 रोजी दु.3.00 वाजता आस्थापना विभागात सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे 03 निविदाधारक प्राप्त झालेले असून त्यांचा तांत्रिक लिफाफा क्र.01 उघडण्यात आलेला आहे.

अ. क्र.	निविदेतील अर्हता	Globesecure Insurance brokers Private Limited	Efficient Insurance Brokers Private limited	IRM Insurance Brokers Private Limited
1.	Name of the Company/Registerd Office Address	✓	✓	✓
2.	Contact Person & Mobile No	✓	✓	✓
3.	GST registration Certificate	✓	✓	✓
4.	Copy of Original License issued by IRDA	✓	✓	✓
5.	Submitted copy of Balance sheet for the two financial year (2020-2021, 2021-2022)	✓	✓	✓
6.	The Agency should not be black listed/Debarred in past from the Union/State Government or any Private Organization all over India. (Recent Notarized Undertaking Must be submitted on Rs.100 stamp paper).	✓	✓	✓
7.	Experience Certificate.	✓	✓	✓

उपरोक्त 03 निवदाधारकांच्या तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अर्हतेच्या कागदपत्रांची छाननी केलेली आहे. सदर Globesecure Insurance brokers Private Limited, Efficient Insurance Brokers Private limited व IRM Insurance Brokers Private Limited यांनी निविदेतील तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अटीशर्तींची पुर्तता केलेली आहे.

निविदेतील अटीशर्तीमधील अट क्र.02 मध्ये "ज्या कंत्राटदाराने लिफाफा क्र.01 मधील अर्हतेची पुर्तता केलेली नसेल तर सदर कंत्राटदार अपात्र गृहित धरुन त्या कंत्राटदाराचा लिफाफा क्र.02 दरपत्रक उघडण्यात येणार नाही." असे नमुद आहे.

उपरोक्त निविदेतील 03 निविदाधारकांनी तांत्रिक लिफाफा क्र.01 च्या अटीशर्तींची पुर्तता केलेली असल्याने उपरोक्त 03 निविदाधारकांचा दरपत्रक उघडण्यात आलेले असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	कामाचे विस्तृत स्वरुप	Globesecure Insurance brokers Private Limited	Efficient Insurance Brokers Private limited	IRM Insurance Brokers Private Limited
1.	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळ्या मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टेंडर व विविध फायर फायटींग वाहनांचा विमा व वाहन विभागामार्फत चालणाऱ्या सर्व वाहनांचा विमा काढणेकरीता विमा सल्लागार/दलाल नेमणेबाबत. (कालावधी 01 वर्ष)	a) रु.54,000/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,150/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.55,150/- प्रती दरमहा मानधन	a) रु.50,500/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,020/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.51,520/- प्रती दरमहा मानधन	a) रु.52,500/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,100/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.53,600/- प्रती दरमहा मानधन

1) Globesecure Insurance brokers Private Limited यांनी रु.54,000/- + सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.1,150/- = रु.55,150/- 2) Efficient Insurance Brokers Private limited यांनी रु.50,500/- + सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.1,020/- = रु.51,520/- तसेच 3) IRM Insurance Brokers Private Limited यांनी रु.52,500/- + सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.1,100/- = रु.53,600/- इतके दर 03 निविदाधारकांनी दिलेले आहेत. सदर 03 निविदाधारकांपैकी Efficient Insurance Brokers Private limited यांनी L1 दर सादर केलेले आहे.

सदर Efficient Insurance Brokers Private limited यांनी सादर केलेले दर L1 असल्याने त्यांची निविदा स्विकृती करुन 01 वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यास तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत खर्चाच्या तपशिलाबाबतचे प्रतिवृत्त मा.प्रशासकीय सभेपुढे ठेवण्यास मा.निविदा निवड समितीने दि.17/04/2023 रोजी शिफारस केलेली आहे. Efficient Insurance Brokers Private limited यांच्या दराचा तक्ता खलालीप्रमाणे आहे

अ.क्र.	कंपनी	दरमहा मानधन	सर्व्हिस चार्जेस/प्रशासकीय चार्ज	एकुण रक्कम (4 + 5) (प्रति महा मानधन)	एकुण वार्षिक खर्च (रुपये)
1	2	4	5	6	7
1.	Efficient Insurance Brokers Private limited	रु.50,500/-	रु.1,020/-	रु.51,520/-	रु.6,18,240/-
एकुण					रु.6,18,240/-

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळ्या मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टेंडर व विविध फायर फायटींग वाहनांचा विमा व वाहन विभागामार्फत चालणाऱ्या सर्व वाहनांचा विमा काढणेकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून Efficient Insurance Brokers Private limited (L1) यांना 01 वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यास तसेच रु.6,18,240/- (सहा लाख अठरा हजार दोनशे चाळीस मात्र) इतक्या होणाऱ्या वार्षिक खर्चाच्या प्रतीवृत्तास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि २६/४/२०२३ वेळ साय ४.५२
मा. प्रशासकीय गोषवारा बोर्ड
रजिस्टर अ. क्र ४३ वर्ष :- २०२३-२४

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

~~सर्वसाधारण सभा~~

प्रशासकीय ठराव दि. 03/04 /2023

८८

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागातील विविध प्रकारच्या विम्याकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून निविदा स्विकृती करण्याबाबत.

कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळया मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टँडर व विविध फायर फायटींग वाहनाचा विमा व वाहन विभागामार्फत चालविणाऱ्या सर्व वाहनांचा दरपत्रकाद्वारे जाहिर सूचना करण्याकरीता दि.17/03/2023 रोजी मा.आयुक्त महोदय यांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उपरोक्त विभागाकरीता विविध प्रकारच्या विम्यासाठी विमा सल्लागार/दलाल यांचेकडून 01 वर्षाकरीता दि.21/03/2023 रोजी दरपत्रकाव्दारे जाहिर निविदा सूचना प्रसिध्द केलेली आहे.

सदर जाहिर निविदा सूचनेमध्ये सिलबंद लिफाफ्यातील दरपत्रक दि.31/03/2023 रोजी दु.3.00 वाजता आस्थापना विभागात सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे 03 निविदाधारक प्राप्त झालेले असून त्यांचा तांत्रिक लिफाफा क्र.01 उघडण्यात आलेला आहे.

अ. क्र.	निविदेतील अर्हता	Globesecure Insurance brokers Private Limited	Efficient Insurance Brokers Private limited	IRM Insurance Brokers Private Limited
1.	Name of the Company/Registerd Office Address	✓	✓	✓
2.	Contact Person & Mobile No	✓	✓	✓
3.	GST registration Certificate	✓	✓	✓
4.	Copy of Original License issued by IRDA	✓	✓	✓
5.	Submitted copy of Balance sheet for the two financial year (2020-2021, 2021-2022)	✓	✓	✓
6.	The Agency should not be black listed/Debarred in past from the Union/State Government or any Private Organization all over India. (Recent Notarized Undertaking Must be submitted on Rs.100 stamp paper).	✓	✓	✓
7.	Experience Certificate.	✓	✓	✓

उपरोक्त 03 निवदाधारकांच्या तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अर्हतेच्या कागदपत्रांची छाननी केलेली आहे. सदर Globesecure Insurance brokers Private Limited, Efficient Insurance Brokers Private limited व IRM Insurance Brokers Private Limited यांनी निविदेतील तांत्रिक लिफाफा क्र.01 मधील अटीशर्तीची पुर्तता केलेली आहे.

निविदेतील अटीशर्तीमधील अट क्र.02 मध्ये "ज्या कंत्राटदाराने लिफाफा क्र.01 मधील अर्हतेची पुर्तता केलेली नसेल तर सदर कंत्राटदार अपात्र गृहित धरुन त्या कंत्राटदाराचा लिफाफा क्र.02 दरपत्रक उघडण्यात येणार नाही." असे नमुद आहे.

उपरोक्त निविदेतील 03 निविदाधारकांनी तांत्रिक लिफाफा क्र.01 च्या अटीशर्तीची पुर्तता केलेली असल्याने उपरोक्त 03 निविदाधारकांचा दरपत्रक उघडण्यात आलेले असून त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	कामाचे विस्तृत स्वरुप	Globesecure Insurance brokers Private Limited	Efficient Insurance Brokers Private limited	IRM Insurance Brokers Private Limited
1.	मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळ्या मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टँडर व विविध फायर फायटींग वाहनांचा विमा व वाहन विभागामार्फत चालणाऱ्या सर्व वाहनांचा विमा काढणेकरीता विमा सल्लागार/दलाल नेमणेबाबत. (कालावधी 01 वर्ष)	a) रु.54,000/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,150/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.55,150/- प्रती दरमहा मानधन	a) रु.50,500/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,020/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.51,520/- प्रती दरमहा मानधन	a) रु.52,500/- प्रती दरमहा मानधन b) सर्विस चार्जेस रु.1,100/- प्रती दरमहा c) एकुण (a + b) रु.53,600/- प्रती दरमहा मानधन

1) Globesecure Insurance brokers Private Limited यांनी रु.54,000/- + सर्विस चार्जेस/प्रशासकीय चार्जेस रु.1,150/- = रु.55,150/- 2) Efficient Insurance Brokers Private limited यांनी रु.50,500/- + सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.1,020/- = रु.51,520/- तसेच 3) IRM Insurance Brokers Private Limited यांनी रु.52,500/- + सर्विस चार्जेस / प्रशासकीय चार्जेस रु.1,100/- = रु.53,600/- इतके दर 03 निविदाधारकांनी दिलेले आहेत. सदर 03 निविदाधारकांपैकी Efficient Insurance Brokers Private limited यांनी L1 दर सादर केलेले आहे.

सदर Efficient Insurance Brokers Private limited यांनी सादर केलेले दर L1 असल्याने त्यांची निविदा स्विकृती करुन 01 वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यास तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत खर्चाच्या तपशिलाबाबतचे प्रतिवृत्त मा.प्रशासकीय सभेपुढे ठेवण्यास मा.निविदा निवड समितीने दि.17/04/2023 रोजी शिफारस केलेली आहे. Efficient Insurance Brokers Private limited यांच्या दराचा तक्ता खलालीप्रमाणे आहे

अ.क्र.	कंपनी	दरमहा मानधन	सर्व्हिस चार्जस/प्रशासकीय चार्ज	एकुण रक्कम (4 + 5) (प्रति महा मानधन)	एकुण वार्षिक खर्च (रुपये)
1	2	4	5	6	7
1.	Efficient Insurance Brokers Private limited	रु.50,500/-	रु.1,020/-	रु.51,520/-	रु.6,18,240/-
एकुण					रु.6,18,240/-

सबब मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापना विभागामार्फत अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय विमा, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेगवेगळ्या मालमत्तांवर विमा, ठेकेदारांमार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विमा, अग्निशमन विभागांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचा तसेच फायर वॉटर टँडर व विविध फायर फायटींग वाहनांचा विमा व वाहन विभागामार्फत चालणाऱ्या सर्व वाहनांचा विमा काढणेकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून Efficient Insurance Brokers Private limited (L1) यांना 01 वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यास तसेच रु.6,18,240/- (सहा लाख अठरा हजार दोनशे चाळीस मात्र) इतक्या होणाऱ्या वार्षिक खर्चाच्या प्रतीवृत्तास मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस विनंती आहे, असा कार्यालयीन प्रस्ताव शासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. ४९ दिनांक 03/04/2023

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागातील विविध प्रकारच्या विम्याकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून निविदा स्विकृती करण्याबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.27/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा.सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व विभागातील विविध प्रकारच्या विम्याकरीता विमा सल्लागार/दलाल म्हणून Efficient Insurance Brokers Private limited (L1) यांची निविदा स्विकृती करुन 01 वर्षाच्या कालावधीकरीता कार्यादेश देण्यास तसेच रु.6,18,240/- (सहा लाख अठरा हजार दोनशे चाळीस मात्र) इतक्या होणाऱ्या वार्षिक खर्चाच्या प्रतीवृत्तास मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवलकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

मिरा भाईंदर महानगरपालिका

//गोषवारा//

दि.03/05/2023

विषय :- 40 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW) या पदनामाची अधिसंख्य पदे निर्माण करुन ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचारी यांना महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांना प्राथमिक वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी सद्यस्थितीत 11 नागरी आरोग्य केंद्र व 01 भारतरत्न इंदिरा गांधी सामान्य रुग्णालय कार्यरत आहेत. आरोग्य केंद्रात देण्यात येणाऱ्या वैद्यकीय सेवा सुविधापैकी हिवताप रुग्णाचे निदान व उपचार ही महत्वाची सेवा आहे. हिवतापाबरोबर डेंग्यु, चिकनगुन्या हेही डासांमुळे उद्भवणारे गंभीर आजार आहेत. शहरात वेगाने होणारे नागरीकरण व त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेली विकास कामे, सांडपाण्याचे नाले बांधण्याची कामे तसेच जीवन शैलीतील बदल, पाण्याचे अयोग्य नियोजन, चुकीच्या पद्धतीने पाणी साठवण्याच्या पद्धती इत्यादीमुळे शहरामध्ये डासोत्पत्ती, स्थाने प्रचंड प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या इत्यादी आजार शहरामध्ये मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. सदर आजारावर नियंत्रण राहण्यासाठी रुग्णाचे रक्त नमुने घेऊन त्यांना उपचार देणे आवश्यक आहे. व राष्ट्रीय किटकजन्यरोग नियंत्रण कार्यक्रम, नागरी हिवताप योजनेनुसार हिवताप प्रतिबंधक योजनामध्ये डास व डासअळी नियंत्रण या व्यतिरिक्त प्रत्यक्ष सर्वेक्षण करणे अत्यंत महत्वाचे आहे. या अंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन रुग्णांची विचारपुस करून आवश्यकतेप्रमाणे रुग्णाचे रक्त नमुने हिवताप निदानासाठी घेण्यात येतात तसेच रक्त नमुने तात्काळ प्रयोगशाळेत पाठवून तपासणीचा अहवाल प्राप्त करुन दुषित रक्त नमुने आलेल्या रुग्णांना तात्काळ उपचार देण्यात येतो.

तरी उपरोक्त कामे करण्यासाठी "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी" (Multi Purpose Worker) ची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा, उप संचालक यांचेकडील पत्र क्र.तांत्रिक/कक्ष-10/साथरोग/13033-35/2011, दि.30/03/2011 व दि.11/04/2011 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस 20000 लोकसंख्येस 01 याप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी किमान 50 आरोग्य कर्मचारी आवश्यक असल्याबाबत कळविले आहे.

सन 2011 च्या जनगणनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेची लोकसंख्या 8.14 लक्ष आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी 41 "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी" (Multi Purpose Worker) आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात हिवताप नियंत्रणासाठी 41 "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी" या पदांचा प्रस्ताव शासनाकडे पदनिर्मितीसाठी पाठविणेस व सदर प्रस्ताव शासनाकडून मंजूर होईपर्यंत सदर पदे करारतत्वावर व ठोक मानधनावर भरणेस मा. महासभा दि.14/12/2012, ठराव क्र.27 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. महासभा दि.14/12/2012, ठराव क्र.27 अन्वये मान्यता दिल्यानुसार संदर्भ क्र.03 व 06 नुसार 41 "बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी" (Multi Purpose Worker) पद भरती करणेकरीता वर्तमान वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर पदभरती

मध्ये बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता विहित करण्यात आलेली होती.

पदनाम	शैक्षणिक व अनुभवाची अर्हता
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (Multi Purpose Worker)	1. इयत्ता 10 वी उत्तीर्ण (SSC) 2. स्वच्छता निरीक्षक पदविका उत्तीर्ण किंवा बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारीचा 12 महिन्याचा प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण 3. अनुभव असल्यास प्राधान्य

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या नियुक्त्या या शालांत परिक्षेत, स्वच्छता निरीक्षक व बहुउद्देशीय आरोग्य कोर्स यामध्ये मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या आधारे गुणवत्ता यादी व निवड यादी नुसार खालील कर्मचारी यांची बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे.

अ.क्र.	नाव	नियुक्ती दिनांक	नियुक्ती आरक्षण (प्रवर्ग)
1.	श्री. अक्षय घोलप	12/08/2013	इतर मागासवर्ग
2.	श्रीम. सायली कदम	12/08/2013	इतर मागसवर्ग
3.	श्री. श्रीकांत कदम	12/08/2013	खुला
4.	श्री. प्रकाश शिंदे	12/08/2013	खुला
5.	श्रीम. सविता कुरकुटे	12/08/2013	अनुसुचित जमाती
6.	श्रीम. अंकिता सावंत	12/08/2013	खुला
7.	श्री. स्वप्नील पवार	12/08/2013	अनुसूचित जमाती
8.	श्री. रमेश काठे	12/08/2013	अनुसुचित जमाती
9.	श्री. विपुल मोहिते	12/08/2013	खुला
10.	श्रीम. भारती बनकर	12/08/2013	अनुसुचित जाती
11.	श्री. मुकुंद रसाळ	12/08/2013	विशेष मागासवर्ग
12.	श्री. भुवनेश नेटके	12/08/2013	खुला
13.	श्री. कल्पेश गोसावी	12/08/2013	भटक्या जमाती (ब)
14.	श्रीम. रुपाली शिंदे	10/01/2014	खुला
15.	श्री. दिनेश पाटील	10/01/2014	खुला
16.	श्री. देवेंद्र वावडणकर	10/01/2014	खुला
17.	श्री. प्रदिप हडळ	10/01/2014	अनुसुचित जमाती
18.	श्री. निलेश राठोड	10/01/2014	विमुक्त जाती (अ)
19.	श्री. गणेश निकम	10/01/2014	खुला
20.	श्री. संदेश भाबड	10/01/2014	खुला
21.	श्रीम. श्रृष्टी तांबे	01/08/2014	अनुसुचित जाती
22.	श्रीम. प्रियंका शिर्के	01/08/2014	अनुसुचित जाती
23.	श्रीम. कल्पना भोये	01/08/2014	अनुसुचित जमाती
24.	श्रीम. रश्मी सावंत	01/08/2014	खुला
25.	श्रीम. ज्योती परदेशी	01/08/2014	भटक्या जमाती (क)
26.	श्रीम. स्नेहल गुरव	14/07/2017	इतर मागासवर्ग

27.	श्री. महेश सोनावणे	14/07/2017	खुला
28.	श्रीम. मनाली तारकर	14/07/2017	इतर मागासवर्ग
29.	श्रीम. रुपाली शेलवले	14/07/2017	इतर मागासवर्ग
30.	श्री. गणेश पाटील	14/07/2017	इतर मागासवर्ग
31.	श्री. सागर पाटील	22/02/2018	इतर मागासवर्ग
32.	श्री. विशाल पाटील	22/02/2018	इतर मागासवर्ग
33.	श्रीम. मोनिका भावे	11/04/2018	अनुसूचित जमाती
34.	श्रीम. आकांशा जिकमडे	15/02/2019	खुला

सदर कर्मचाऱ्यांना मा. महासभा तसेच मा. स्थायी समितीच्या मान्यतेने दर सहा महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड वेळोवेळी देऊन नियुक्तीचे नविकरण करण्यात आले आहे.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. परंतु सदर आकृतीबंधात वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी हे पद मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करुन देखील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी हे पद मंजुर करण्यात आलेले नाही.

तरी सदरचे पद अत्यावश्यक सेवेत येत असल्याने सदर पदाच्या कामाची निकड व जबाबदारी विचारात घेता नवी मुंबई महानगरपालिका आस्थापनेवर बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी हे पद संदर्भ क्र.07 च्या शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आलेले आहे. तरी सदर पद त्याच धरतीवर मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर मा. महासभा दि.14/12/2012, ठराव क्र.27 व मा. महासभा दि.30/01/2016, ठराव क्र.103 अन्वये बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या 41 पदाच्या पद निर्मितीस मान्यता दिल्यानुसार पदनिर्मिती करणे आवश्यक आहे.

तसेच मा.महासभा दि.30/01/2016 ठराव क्र.103 अन्वये बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रतेस मान्यता देण्यात आलेली आहे.

पदनाम व श्रेणी	नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती
बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (हिवताप) (श्रेणी-3, निमवैद्यकीय सेवा)	नामनिर्देशन/ सरळसेवा-100%	अ) इयत्ता 10 वी उत्तीर्ण. ब) बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारीसाठीचा शासन मान्य 12 महिन्यांचा प्रशिक्षण पाठयक्रम उत्तीर्ण. क) हिवताप निर्मुलन कार्यक्रमामध्ये काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य किंवा अ) स्वच्छता निरीक्षकाचा मान्यताप्राप्त संस्थेतील अभ्यासक्रम उत्तीर्ण. ब) हिवताप निर्मुलन कार्यक्रमामध्ये काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांकरीता मासिक वेतन अंदाजित रु.8 लाख इतका खर्च होत आहे. सदर कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेतल्यास त्यांचा मासिक वेतन अंदाजे रु.15 लाख खर्च अपेक्षित आहे.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे

वर्गीकरण) नियम- 2019 नुसार बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी या पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता विहित करण्यात आली आहे.

पदनाम व श्रेणी	नेमणुकीची पध्दत व टक्केवारी	नेमणूकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती
